रसिकहो,

डोंबिवली येथे होत असलेल्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केलीत हा माझ्या आजवरच्या आयुष्यातला मला मिळालेला सर्वोच्च सन्मान आहे असं मी मानतो. पुन्हा त्यात भाग्य असं की हा मान मला नाट्यपरिषदेच्या शताब्दी वर्षात मिळत आहे. आणि तोही डोंबिवलीसारख्या अभिरुचीसंपन्न रसिकांच्या नगरीत. एक कलावंत म्हणून डोंबिवलीकरांच्या रसिकतेचा मी अनेकदा अनुभव घेतला आहे आणि त्यांच्या प्रेमाचाही धनी झालो आहे.

रसिकहो. हा सन्मान स्वीकारताना माझ्या मनात अनेक विचार दाटून आले आहेत. एकीकडे आनंदाच्या ऊर्मी उसळत असताना दुसरीकडे नाट्य लेखनातले माझे गुरु प्रा. वसंत क़ानेटकर, अभिनयाचे धडे मी ज्यांच्या हाताखाली घेतले ते गुरुवर्य मामा पेंडसे, नंदकुमार रावते या माझ्या गुरुचे गुरु आत्माराम भेंडे या दिग्गजांनी भूषविलेल्या या पदाला स्पर्श करतानाही मला संकोच वाटत आहे. आज जवळजवळ चाळीस वर्ष मी रंगभूमीवर वावरत आहे. वावरणं हे क्रियापद मी जाणीवपूर्वक वापरीत आहे. मी रंगभूमीची सेवा वगैरे काही केली असं मला वाटत नाही. कर्तृत्व किंवा योगदान हे शब्दही मी वापरणार नाही. मी वावरलो. ती एक प्रामाणिक, निष्ठेनं केलेली धडपड होती. कलात्मक सृजनाच्या आनंदाचा तो शोध होता. तो शोध घेताना नट होण्याचं स्वप्न पहाणारा मी नाटककार झालो.